**सी.एन.आर. नं. एमएचएसआय ०७ –०००४७६–२०१७**

**नि.दि.मु.क्र. ७६/२०१७ मधील नि.क्र. ३२ वरील आदेश**

अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने त्याच्याविरुध्द नि.क्र. १ वर दावा विनाकैफियत व नि.क्र. ५ वरील अर्ज विनाम्हणणे चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील नमूद कारणांचा विचार होवून वर नमूद आदेश रद्दबातल करण्यात यावा इत्यादी बाबी प्रतिवादी क्र. १ तर्फे नमूद करण्यात आलेल्या आहेत.

०३. प्रस्तुत अर्जाकरीता वादीने आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ याने कैफियत व म्हणणे देण्यास जाणीवपुर्वक विलंब केलेला आहे. अर्जात नमूद कारण संयुक्तिक नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादीने केली आहे.

०४. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता; नि.क्र. १ वर दावा व नि.क्र. ५ वरील अर्ज अनुक्रमे प्रतिवादी क्र. १ याच्या कैफियतीशिवाय व म्हणण्याशिवाय चालविण्यात यावा असा आदेश दि. ०६/१२/२०१७ रोजी पारीत झालेला आहे. सदरील आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी सदर प्रतिवादीने दि. १६/०४/२०१८ रोजी अर्ज दाखल केलेला आहे असे दिसून येते. अर्जातील नमूद कारणे प्रथमदर्शनी संयुक्तिक वाटत नाहीत. तरीपरंतु, दाव्यातील वादीची मागणी लक्षात घेता, नि.क्र. १ वरील दि. ०६/१२/२०१७ रोजीचा आदेश रद्दबातल करणे उचित राहील. सदर प्रतिवादीने कैफियत व म्हणणे दाखल करण्यास केलेला विलंब पाहता; त्याच्यावर रक्कम रुपये ३००/– इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम वादीस देवविण्याचा आदेश करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ याच्यावर रक्कम रु. ३००/– (रक्कम रुपये

तीनशे मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. १ वरील दि. ०६/१२/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द दावा विनाकैफियत व नि.क्र. ५ वरील अर्ज विनाम्हणणे चालविण्यात यावा असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ याने वादीस पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—२१ फेब्रुवारी, २०१९ (आर.आर.काळे)<br>
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.